Maharashtra Information Technology Support Center
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

MITSC/OUT/SEPTEMBER 2023/M/ 526 दि.05/09/2023

**प्रति,**
**प्राचार्य,**
**जी. एस. सायन्स, आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज,**
**खामगाव**

**विषय: करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यातील सेंटर ऑफ एक्सलन्स निवडीबाबत....**

महोदय,
उपरोक्त विषयास अनुसरून आपणास विनंती अशी की, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या **"करिअर कट्टा"** या उपक्रमाअंतर्गत राज्यभरामध्ये उभे करण्यात येणाऱ्या **सेंटर ऑफ एक्सलन्स** अंतर्गत आपण विहित नमुन्यामधील कार्यपुर्तता केलेली आहे, त्याबद्दल आपल्या महाविद्यालयाचा **"B GRADE"** सह सेंटर ऑफ एक्सेलच्या यादीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. त्याबद्दल आपल्या महाविद्यालयाचा सन्मान **प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी तसेच संचालक उच्च व तंत्र शिक्षण विभाग** यांच्या उपस्थितीमध्ये, **महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे कॅबिनेट मंत्री सन्माननीय चंद्रकांत दादा पाटील** यांच्या हस्ते प्रमाणपत्र व निधीचा धनादेश देऊन होणार आहे.
सदर कार्यक्रम **दिनांक 8 सप्टेंबर, 2023 रोजी सायंकाळी 04.00 वाजता महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे** येथे पाचव्या मजल्यावरील सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे. तरी महाविद्यालयाचे प्राचार्य, महाविद्यालयीन समन्वयक व आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी संसदेचे मुख्यमंत्री यांनी सदर कार्यक्रमास उपस्थित रहावे, ही विनंती.
**महाविद्यालयांचे प्राचार्य व समन्वयक यांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा!!!**

आपला विश्वासू,

Yasswant

**यशवंत शितोळे**
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान
सहाय्यता केंद्र

**Yashwant Shitole**
*Founder President*
**+91 73044 29777**

Mahila Bank Basement,
Khasbag Maidan, Kolhapur-416 012
0231-2993950
www.mitsc.co.in
uvajagar@gmail.com